।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

**EXAMINATION SECTION**

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: directorboee@gmail.com**

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२१-२२/१००८ दिनांक : ११/०२/२०२१

## महत्वाचे परीपत्रक

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड.
संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर.
संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, परभणी.
प्राचार्य, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
समन्वयक, कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.
सर्व परीक्षा केंद्र प्रमुख, हिवाळी-२०२१ परीक्षा, प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: हिवाळी-२०२१ सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे केंद्र/महाविद्यालयास महत्वाच्या सूचना.**

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२१, पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया विद्यापीठामार्फत दिनांक ०८/०२/२०२२ सुरू झालेल्या आहेत. तसेच पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा २२/०२/२०२२ आणि ०२/०३/२०२२ पासुन घेण्यात येणार आहेत. हिवाळी-२०२१ परीक्षेतील विद्यार्थी व परीक्षा केंद्रप्रमुखांना मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे

### अ) विद्यार्थ्यांना सूचना

१. सध्या कोविड-१९ व ओमिक्रॉन या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२१ परीक्षा हया बहुपर्यायी (MCQ) प्रश्नपत्रिकेव्दारे ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

२. ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणा-या परीक्षा हया विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या चारही जिल्हयात परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहेत.

३. विद्यार्थ्याने संमती पत्रावर दिलेला मोबाईल क्रमांक हा ऑनलाईन परीक्षेकरीता ग्राहय धरण्यात येईल व नंतर त्या क्रमांकात कोणताही बदल केला जाणार नाही ही बाब विद्यार्थ्यांना कळवावी.

४. ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतंत्र मोबाईलची व्यवस्था करणे आवश्यक आहे. एका मोबाईलवर एकाच विद्यार्थ्याने परीक्षा देणे बंधनकारक राहील. त्याचा गैरवापर झाल्यास विद्यापीठ नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

५. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणारे विद्यार्थी घरी बसुन मोबाईलव्दारे देवू शकतात त्यासाठी अॅन्ड्रॉइड मोबाईल तसेच इंटरनेट सुविधा इत्यादी तयार ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

६. ऑफलाईन परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून परीक्षा देणे अनिवार्य आहे.

७. या परीक्षेमध्ये निगेटिव्ह मार्कींग नसेल.

८. ऑनलाईन पध्दतीच्या परीक्षा हया Proctored Method नुसार घेण्यात येणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा देतांना कोणत्याही गैरप्रकाराचा वापर करू नये, असे आढळून आल्यास नियमाप्रमाणे संबधीत विद्यार्थ्यावर कारवाई करण्यात येईल.

९. हिवाळी-२०२१, पदवी व इतर अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका ही बहुपर्यायी (MCQ) स्वरूपाची असेल. अव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका ही ४० प्रश्नांची व ४० गुणांची असेल. प्रत्येक प्रश्नांसाठी १ गुण देण्यात येईल. सदर परीक्षेचा कालावधी हा एक (१) तासाचा राहील. प्रत्येक प्रश्नांच्या उत्तरासाठी चार पर्याय असतील त्यापैकी विद्यार्थ्याने अचूक उत्तर निवडावे. अभ्यासक्रम निहाय ४० गुणापैकी प्राप्त गुणांचे रुपांतर कमाल गुणांमध्ये करण्यात येवून गुणदान करण्यात येणार आहे.

१०. पदव्युत्तर अभ्यासक्रम व व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी प्रश्नपत्रिका ही ४० गुणांचा असेल व प्रश्नपत्रिकेमध्ये ५० बहुपर्यायी (MCQ) प्रश्न असतील. सदर परीक्षेचा कालावधी हा एक (१) तासाचा राहील. प्रत्येक प्रश्नांच्या उत्तरासाठी चार पर्याय असतील त्यापैकी विद्यार्थ्याने अचूक उत्तर निवडावे. प्रत्येक प्रश्नास एक गुण असेल. अभ्यासक्रम निहाय ४० गुणाचे पैकी प्राप्त गुणांचे रुपांतर कमाल गुणांमध्ये करण्यात येवून गुणदान करण्यात येणार आहे.

११. ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा कालावधी हा एक तासाचा राहील. ऑनलाईन परीक्षेदरम्यान काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेव्हढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला वाढवून देण्यात येईल.

१२. वेळापत्रकानुसार पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने परीक्षा हया एकाच वेळेस सुरु होतील.

१३. हिचाळी-२०२१ परीक्षेदरम्यान ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे अनुतीर्ण झाल्यास अशा विद्यार्थ्याची पुनर्परीक्षा घेण्यात येणार नाही. अशा अनुतीर्ण विद्यार्थ्यांना उन्हाळी-२०२२ मध्ये परीक्षा दयावी लागेल याची सर्व विद्यार्थ्यानी नोंद घेणे आवश्यक आहे.

## ब) परीक्षा केंद्र प्रमुखांसाठी महत्वाच्या सूचना:

१. विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या सर्व परीक्षा केंद्रावर ऑफलाईन परीक्षेसाठी विद्यापीठामार्फत सर्व प्रश्नपत्रिका ऑनलाईन पध्दतीने ई-डिलिव्हरी मार्फत पाठविण्यात येणार आहेत. त्यासाठी परीक्षा केंद्रावर गोपनीय कक्ष तयार करण्यात यावा. सदर गोपनीय कक्ष सीसीटीव्ही कॅमे-याच्या नजरेत असेल अशी व्यवस्था करावी. सदर कक्षामध्ये अद्यावत संगणक वेब कॅम-यासह/लॅपटॉप असणे आवश्यक आहे. परीक्षेदरम्यान अचानक विज/लाईट गेल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून तेथे बॅटरी बॅकअपची व्यवस्था करावी. प्रश्नपत्रिकेच्या झेरॉक्स करणेसाठी अद्यावत झेरॉक्स मशीनची व्यवस्था असावी. या गोपनीय कक्षामध्ये परीक्षा केंद्रप्रमुख, सहकेंद्रप्रमुख आणि संबधीत कर्मचा-याशिवाय इतर व्यक्तीना प्रवेश देण्यात येवू नये. प्रश्नपत्रिकेचा कोणताही गैरप्रकार होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

२. परीक्षा केंद्र प्रमुखानी दररोज वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ठाउनलोड करून घ्यावी व LAC नुसार त्याच्या झेरॉक्स प्रती काढून परीक्षा घ्यावी.

३. ऑफलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर हिवाळी-२०२१ परीक्षेसाठी येणा-या दीव्यांग विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था तळमजल्यात करण्यात यावी. सदर विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी दीव्यांग विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेूवन लेखनीकाची परवानगी देण्यात यावी. त्यांना परीक्षेतील कालावधीसाठी प्रति तासाला विस मिनीटे जास्तीची वेळ वाढवून देण्यात यावा.

४. हिवाळी-२०२१ परीक्षेतील सर्व प्रकारचे मानधन हे उन्हाळी-२०२१ परीक्षेतील मानधनाप्रमाणे देय असेल, त्यानुसार परीक्षा केंद्रप्रमुखांनी त्यांचे देयक सादर करावेत.

५. उत्तरपत्रिकेचा साठा कमी पडल्यास लातूरसाठी-उपकेंद्र लातूर, परभणीसाठी-उपकेंद्र, परभणी, हिंगोलीसाठी-न्यु डिग्री मॉडेल कॉलेज, हिंगोली तसेच नांदेड जिल्हयासाठी प्रस्तुत विद्यापीठ येथे साठा असून आवश्यक पडल्यास त्या त्या ठिकाणावरून उत्तरपत्रिका हस्तगत करावेत.

६. ऑफलाईन परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्याची बैठक व्यवस्था ही कोविड-१९ व ओमिक्रॉन या विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करावे (उदा. ४० बैठक व्यवस्था असलेल्या हॉलमध्ये केवळ २० विद्यार्थ्याची बैठक व्यवस्था करावी) त्यानुसारच पर्यवेक्षकांची नियुक्ती करावी या बाबतची पूर्ण जबाबदारी महाविद्यालय/परीक्षा केंद्रप्रमुखाची राहील.

७. कोविड-१९ व ओमिक्रॉन या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी आरोग्यास सर्वोच्च प्राधान्य देवून विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित डोळयासमोर सर्व परीक्षा केंद्रातील दालनाचे निर्जंतुकीकरण (Sanitization) करून घेण्यात यावे यासाठी परीक्षा केंद्राना निर्जंतुकीकरण (Sanitization) करणेसाठी रू. २००० (रूपये दोन हजार) विद्यापीठामार्फत देण्यात येतील त्याबाबतचे देयके परीक्षा केंद्र देयकामध्ये नमुद करावेत.

८. ऑफलाईन परीक्षेसाठी सर्व परीक्षा केंद्रानी विद्यार्थ्यांसाठी Thermal Scanning Machine, Sanitizer चा वापर करावा तसेच विद्यार्थी व परीक्षेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तोंडाला मास्क बांधणे, परीक्षा केंद्रावर Social Distancing पाळणे बंधनकारक असेल. तसेच शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कोविड-१९ व ओमिक्रॉन विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाचे पालन करणे बंधनकारक राहील व यासाठी शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या सर्व परीपत्रकाचे अनुपालन करावे.

९. ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा-या विद्यार्थ्यास जर कोविड-१९ व ओमिक्रॉन आजार सदृष्य लक्षणे आढळून आल्यास अशा विद्यार्थ्याची बैठक व्यवस्था स्वतंत्र वर्गात करण्यात यावी व अशा विद्यार्थ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र परीक्षा केंद्र अहवालाबरोबर विद्यापीठाकडे सादर करावे.

१०. ऑफलाईन पध्दतीने संपन्न होणा-या उत्तरपुस्तिकांचे संकलन सर्व परीक्षा केंद्रावरून विद्यापीठ वाहनाव्दारे करण्यात येणार आहे, त्यामुळे सर्व परीक्षा केंद्रप्रमुखांनी दररोज सत्रनिहाय संपन्न होणा-या परीक्षांच्या उत्तरपत्रिका दररोजच्या दररोज सिलबंद करावेत, त्या पाकिटमध्ये उत्तरपत्रिका, उपस्थिती अहवाल, प्रश्नपत्रिकेच्या दोन प्रती इत्यादी पाठवावेत. सिलबंद पाकिटावर विषय, कोड, दिनांक नमुद करावेत. तसेच उत्तरपत्रिकांचा Serial number ज्या इंग्रजी मुळाक्षर उदा. A, B, C ने सुरू होतो तो मोठया अक्षरात सिलबंद पाकिटावर नमुद करावा. जेणे करून निकाल प्रक्रिया करतांना अडचण येणार नाही. उत्तरपत्रिका चुरगाळू अथवा घडी करू नये.

११. सर्व पर्यवेक्षकांना सूचीत करावे की, विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेवर नोंदविलेला बैठक क्रमांक, प्रवेशपत्र, ओळखपत्र विद्यार्थ्याची स्वाक्षरी योग्य असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जेणे करून विद्यार्थ्याचे निकाल प्रक्रिया करताना अडचण निर्माण होणार नाही.

१२. हिवाळी-२०२१ परीक्षेत I.T. Coordinator म्हणून नेमलेल्या शिक्षकांना पर्यवेक्षकाचे काम देण्यात येवू नये, कारण संबधीत शिक्षकांना दोन्ही सत्रामध्ये ऑनलाईन परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान येणा-या तांत्रिक अडचणीसाठी मदत करणे नेमण्यात आहे.

१३. महाविद्यालयीन प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुखांनी या परीक्षे दरम्यान परीक्षा केंद्रावर कोणतेही गैरप्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. असे आढळून आल्यास सर्व संबधीतावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१४. हिवाळी-२०२१ परीक्षा ऑनलाईन पध्दतीने देणा-या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचण आल्यास महाविद्यालयस्तरावर नेमण्यात आलेल्या I.T. Coordinator यांच्याशी संपर्क साधावा. I.T. Coordinator ची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच महाविद्यालय प्रशासनाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयातील I.T. Coordinator चा भ्रमणध्वनी कळवावा.

१५. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणा-या विद्यार्थ्यासाठी ऑनलाईन परीक्षेसंबधी सर्व सूचना व डेमो व्हिडीओ विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आलेला आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे सर्व बाबीची नोंद घेवून हिवाळी-२०२१ सर्व पदवी, पद्व्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेणे बाबतची कार्यपध्दती व सूचना सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावी व परीक्षा यशस्वीपणे पार पाडणेसाठी सहकार्य करावे.

(डॉ. रवि एन. सरोदे)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ